भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सह्योगीत

# ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक – सिंधुदूर्ग

कालावधी (दिनांक १८.०४.२०२० ते २२.०४.२०२०)

अंक ३०/२०२० | दिनांक १७.०४.२०२० | कालावधी ५ दिवस

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (१०/०४/२०२० ते १६/०४/२०२० पर्यंत) | | | | | | | हवामान घटक | | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पुर्वानुमान (वैधता १८/०४/२०२० ते २२/०४/२०२० पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १०/०४ | ११/०४ | १२/०४ | १३/०४ | १४/०४ | १५/०४ | १६/०४ | दिनांक | | १८/०४ | १९/०४ | २०/०४ | २१/०४ | २२/०४ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मि. मी) | | ५ | ५ | ३ | १ | ५ |
| ३८.० | ३८.५ | ३९.० | ३९.० | ३७.५ | ३७.० | ३७.० | कमाल तापमान (अं. से) | | ३७ | ३७ | ३७ | ३७ | ३७ |
| २५.० | २५.० | २५.० | २४.० | २४.० | २५.० | २३.० | किमान तापमान (अं. से) | | २६ | २७ | २७ | २७ | २६ |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | ढगाळ | निरभ्र | ढगाळ | ढगाळ | सकाळ | मेघाच्छादन (ऑक्टा.) | ० | २ | २ | १ | २ |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | दुपार | | | | | | |
| ८४ | ८५ | ८४ | ८४ | ८४ | ९२ | ९२ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | | ९१ | ७९ | ८६ | ७९ | ७४ |
| ४० | ४५ | ४५ | ५४ | ४१ | ३९ | ४३ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | | ४१ | ३४ | ३२ | ३१ | २८ |
| १.९ | २.३ | २.१ | २.१ | १.९ | २.० | २.२ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | | ३ | ३ | ४ | ५ | ४ |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | सकाळ | वा-याची दिशा | आग्नेय कडे | ईशान्य कडे | आग्नेय कडे | ईशान्य कडे | आग्नेय कडे |
| ईशान्य | ईशान्य | ईशान्य | उत्तर | ईशान्य | ईशान्य | ईशान्य | दुपार | | | | | | |

| मागील वर्षातील (२०१९) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०२० पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०२० पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ४५९१.० | ०.० | ०.० | ०.० |

**पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती:** सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये येत्या पाच दिवसात तापमानातील वाढीबरोबर आद्रतेमध्ये घट होण्याची शक्यता असून हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. असा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाकडून वर्तविण्यात आला आहे

## हवामान पुर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| आंबा | फळविकास ते काढणी | जिल्ह्यामध्ये आंबा पीकामध्ये काही ठिकाणी अंड्याच्या आकाराची फळे व मोठया आकाराची काढ्णीची फळे अशी अवस्था आहे. तयार फळे सकाळी दहाच्या अगोदर व दुपारी चारच्या नंतर नुतन झेल्याच्या सहाय्याने ८० ते ८५ टक्के (चौदा आणे) पक्वतेला काढावीत. काढलेली फळे साका टाळण्यासाठी व उष्णतेपासुन बचाव करण्यासाठी सावलीत ठेवावीत. शिफारसीनुसार बुरशीनाशकाची व ईथीलीनची प्रक्रिया देवुन पिकवावीत. शक्यतो आंब्याची वाहतुक रात्रीच्यावेळी करावी. आंबा फळे काढणीच्या किमान ८ दिवस अगोदर झाडावर कोणतेही औषध फवारु नये. नवीन आंबा लागवडीमध्ये रोपांचे ऊष्णतेपासुन संरक्षण करण्यासाठी शेडनेटचे आच्छादन करावे. तसेच रोपांना पाणी देउन अळ्यांमध्ये पालापाचोळा, भाताचे तुस किंवा गवत यांचे आच्छादन करावे.<br>तापमानामध्ये वाढ होण्याची शक्यता असल्यामुळे पाण्याची उपलब्धता असल्यास झाडांना विस्तारानुसार प्रती झाड १५०-२०० लि. पाणी १५ दिवसांच्या अंतराने द्यावे. बाष्पीभवन कमी करण्यासाठी जांभा जमिनीमधील आंबा कलमांना गवताचे आच्छादन द्यावे. |
| काजु | काढणी | काजुमध्ये काढणीयोग्य बी तयार झालेली आहे. तयार झालेल्या बीयांची काढणी करुन ती ऊन्हामध्ये योग्यप्रकारे वाळवावी.<br>काजुच्या झाडाला रोठा किड लागली असल्यास पाने पिवळी पडतात व खोडामधुन छिद्राद्वारे भुसा बाहेर पड्लेला दिसतो. काजुवर खोड्किडा (रोठा) या किडिचा प्रादुर्भाव आढळुन आल्यास १५ मि.मी. पटाशिच्या सहाय्याने प्रादुर्भित साल काढून झाडातील रोठ्याला बाहेर काढून मारुन टाकावे व तो भाग २०% प्रवाही क्लोरोपायरीफॉस ५० मी. लि. १० लिटर पाण्यामध्ये मिसळून चांगला भिजवावा. किंवा ५% प्रवाही फिप्रोनील २ मी. लि. प्रति १ लिटर पाण्यामध्ये मिसळवून चांगला भिजवावा. (एका झाडासाठी ५ लिटर पाणी या प्रमाणात वापरावे) |
| नारळ | फळविकास | येत्या आठवड्यात तापमान वाढीबरोबर आद्रते मध्ये घट होण्याची शक्यता असल्यामुळे नारळ पिकावर पांढ-या माशीचा प्रादुर्भाव येण्याची शक्यता आहे, नियंत्रणासाठी पिवळे चिकट सापळे बसवावे तसेच तयार झालेली काळी काजळी धुवुन काढण्यासाठी १% पिष्टमय पदार्थाची (स्टार्च) (१० ग्रॅम स्टार्च प्रति लिटर पाणी) फवारणी करावी. त्याचबरोबर जास्त प्रादुर्भाव दिसुन आल्यास ०.५% निम तेलाची (५ ग्रॅम प्रति १० लि. पाणी) फवारणी करावी. तसेच किटक नविन क्षेत्रात पसरु नये यासाठी ०.००५% ईमिडाक्लोप्रिड (०.५ मिलि प्रति १० लि. पाणी)या किटकनाशकाची फवारणी करावी. |
| वायंगणी भात | दाना भरण अवस्था ते पक्वता | काही ठिकाणी भात पीक हे दाना भरण्याच्या अवस्थेत आहे. भात पिकाला नियमितपणे ४ ते ५ दिवसाच्या अंतराने पाणी द्यावे<br>भाताच्या काही जातींमध्ये भात पीक कापनीच्या अवस्थेत आहे. कापणीपूर्वी ८ ते १० दिवस अगोदर शेतातील पाणी काढून दयावे. तयार झालेल्या वायंगणी भाताची कापणी विद्यापीठाने प्रसारित केलेल्या वैभव विळ्याच्या साहायाने जमिनीलगत करावी सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये दिनांक १५, १७ व १८ एप्रिल, २०२० रोजी हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्यामुळे पावसाचा अंदाज पाहून भाताची कापणी करावी व कापलेल्या भाताच्या पेंढ्या व्यवस्थित झाकून ठेवाव्यात |
| भुईमुग | शेंगांचा विकास ते काढणी | तापमानाबरोबर बाष्पीभवनामधध्ये वाढ होत असल्याने भुईमुग पिकाला पेरणीनंतर १० ते १२ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. त्याचप्रमाणे काही ठिकाणी भुईमुग पीक पक्व होण्याचच्या अवस्थेत आहे. काढणीसाठी तयार झालेल्या भुईमुगाची पाने पिवळी होऊन गळु लागल्यास तसेच शेंगेच्या आतील साल काळसर व शेंगदाण्यास योग्य रंग आला असल्यास काढणी करावी. काढणी केलेल्या शेंगा उन्हामध्ये ४ ते ५ दिवस वाळ्वुन नंतर साठवणुक करावी. |
| सूर्यफूल | काढ्णी | काही ठिकाणी सुर्यफुल पीक तयार झालेले आहे. वाळलेली फुले विळ्याने कापुन ऊन्हात वाळवावी आणि शक्य असल्यास मशीनच्या सहाय्याने अथवा काठीने दांड्कून दाणे वेगळे करावेत. उफणणी करुन दाणे स्वच्छ करावेत आणि ऊन्हात वाळवून साठवुन ठेवावेत. |
| चवळी, वाल व कुळीथ | काढ्णी | कुळीथ, चवळी आणि वाल हि पिके काढणीस तयार झालेली आहेत. तयार झालेल्या शेंगा काढून उन्हामध्ये चांगल्या वाळवाव्यात त्याचबरोबर लगेचच त्याची मळणी करून घ्यावी. पावसाचा अंदाज पाहून काढणी व मळणी करून घ्यावी |
| माती परिक्षण | - | जमिनीतील नत्र, स्फुरद व पालाशाचे प्रमाण तपासण्यासाठी खरीप पीकाची काढणी केल्यानंतर लगेचच मातीचा नमुना घ्यावा व तपासणीसाठी जवळच्या माती परीक्षण प्रयोगशाळेकडे पाठवावा. मातीचा नमुना कसा घ्यावा याबाबत अधिक माहितीसाठी मृद शास्त्रज्ञ, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला यांचेकडे संपर्क साधावा. (दुरध्वनी क्र. ०२३६६-२६२२३४) |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील "ग्रामीण कृषि मौसम सेवा" योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.

| डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>सहयोगी अधिष्ठाता<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग | डा. प्रदिप च. हळदवणकर<br>नोडल ऑफिसर<br>(ग्रामिण कृषि मौसम सेवा)<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>¼०२३६२-२४४२३१½ | डा. यशवत च. मुठाळ<br>तांत्रिक अधिकारी<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>¼०२३६२-२४४२३१½ |
|---|---|---|